दै. गोदातीर दि. 06/09/2024.

# ४४ ग्रॅम सोन्याचे ३ गंठण जप्त; चोरही गजाआड



**नांदेड–** 'ऑपरेशन फ्लश ऑऊट' मोहिमेमुळे सराईत गुन्हेगार पोलिसांच्या जाळ्यात अडकत आहेत. अशाच एका जबरी चोरी करणारा चोरट्याला भाग्यनगर पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून सोन्याचे तीन गंठण जप्त करण्यात आले आहेत.

भाग्यनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली डी. बी. पथकाचे पोउपनि. विनोद देशमुख सोबत अंमलदार यांना मालेगाव रोडवर पेट्रोलींग दरम्यान भाग्यनगर ठाण्यात गु.र.नं. २९१/२०२४ कलम ३०९(४), ३(५) बी. एन.एस हा गुन्हा केलेला आरोपी नांदेड स्पेशल आलु बिर्याणी या हॉटेलवर असल्याची माहिती मिळाली.

त्यानुसार अधिकारी व अंमलदार यांनी त्या ठिकाणी जाऊन आरोपीस ताब्यात घेतले. मुकेश गजानन कल्याणकर (वय २४ वर्षे रा. देवीनगर, मालेगाव ता. अर्धापुर जि. नांदेड) असे त्याचे आहे. त्याची कसून चौकशी केली असता त्याने व त्याचे सोबतचे इतर आरोपी गणेश दिलीप धबाले, राहुल जाधव व यश चितडवाड तीघे रा. शिवनगर, नांदेड यांनी वरील गुन्हा केला असल्याचे सांगितले. ताब्यातील व्यक्तीकडून भाग्यनगर ठाण्यात २९१/२०२४ कलम ३०९ (४),३(५) बी. एन. एस. मधील दोन सोन्यांचे गंठण व पोलीस स्टेशन भाग्यनगर, नांदेड गु.र.नं. २३९/२०२४ कलम ३९२,३४ भा.दं. वि. मधील एक असे ३ सोन्याचे गंठण ४४ ग्रॅम वजनाचे किंमती ३ लाख २१ हजार ५२७ रुपयांचा पूर्ण मुद्देमाल जप्त केला. ही कामगिरी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, सहाय्यक पोलीस अधीक्षक किरितीका सी. एम. यांचे आदेशावरून पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख, हवालदार गजानन किडे, प्रदिप गर्दनमारे, ओमप्रकाश कवडे, सूर्यभान हासे व नवनाथ गुट्टे यांनी पार पाडली आहे.

दै. गोदातीर दि. 06/09/2024

# कत्तलीसाठी जाणाऱ्या १८ बैलांसह वाहन जप्त; नांदेड ग्रामीण पोलिसांची कारवाई



**नवीन नांदेड–** पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन 'फ्लश ऑऊट' अंतर्गत अवैध धंद्यांवर कारवाईचे सत्र सुरु आहे. कत्तलीसाठी घेवून जाणाऱ्या १८ बैलांसह वाहनही जप्त करण्यात आले. नांदेड ग्रामीण पोलिसांनी दि. ४ सप्टेंबर रोजी ही धनेगाव येथे ही कारवाई केली. १८ बैलांसह वाहन असा १९ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

नांदेड ग्रामीणचे गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे यांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे बोंढार मार्गे धनेगावकडे बैल नेणाऱ्या एका वाहनाला (एमएच २० ईएल ७८८७) पकडण्यासाठी टापरे चौकात सापला लावला. कोरे यांच्या सोबत असलेल्या अंमलदार पोहेकॉ शेख सत्तार, पोकों मारोती पचलिंग यांनी वाहनास थांबविले. वाहनात गोवंश जातीच १८ बैल आढळून आले. त्यानंतर आरोपी शेख फिरोज रब्बानी व्यवसाय चालक, कुरेशी अबुजर बशीर व्यवसाय मजुरी, जावेद अजीज शेख व्यवसाय मजुरी, शेख गुलाम रसुल शेख पिराण सर्व रा.बोरगाव सारवनी ता.सिल्लोड जि. छत्रपती संभाजी नगर, हबीब खान हुसेन खान रा.जळगाव या पाच आरोपी विरूध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील १८ बैलांना गोशाळेत सोडण्यात आले.

पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधिक्षक सुरज गुरव, अपर पोलीस अधिक्षक भोकर खंडेराय धरणे, उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभागाग इतवारा सुशीलकुमर नायक यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने पथकाचे पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे, पोहेकॉ शेख सतार, पोकों पचलिंग यांनी ही कारवाई पार पाडली आहे. सदर पथकाचे पोलीस अधिक्षक नांदेड यांनी कौतुक केले आहे.